न दुपारा जेवणा आधीं । भक्त जाऊनियां बैसती मशीदीं ॥
रिती गंधाक्षत अर्घ्यपाद्यादी । पूजा सविधी बाबांची ॥ ८१ ॥
नंतर ती पंचारती । बापूसाहेब जोग करिती ॥
कि प्रेमें ओवाळिती । आरत्या म्हणती भक्तजन ॥ ८२ ॥

ा आरतीची निदर्शक भली । घंटा घण घण वाजूं लागली ॥
म्ही मशीदीची वाट धरिली । मनीषा फिटली मनाची ॥८३॥
यान्ह समर्थांची ही आरती । नरनारी मिळूनियां करिती ॥
या मशीदींत वरती । पुरुष खालती मंडपीं ॥ ८४ ॥
ळ वाद्यांचिया गजरीं । तासांचिया झणत्कारीं ॥
रत्या म्हणती उच्चस्वरीं । हर्षनिर्भरीं तेधवां ॥ ८५ ॥
तळीं आम्ही मंडपद्वारीं । आरती चालली घन गजरीं ॥
ष मंडळी वेष्टिली पायरी । रीघ ना वरी जावया ॥ ८६ ॥
ह्या मनीं असावें खालीं । जोंवरी आरती नाहीं संपली ॥
पतांच मग बाबाजवळीं । जावें मंडळी समवेत ॥ ८७ ॥
णोन मी जों मनीं आणिलें । माधवराव पायरी चढले ॥
राग्रीं धरून मजही ओढिलें । जवळीं नेलें बाबांचें ॥ ८८ ॥
बा निज स्थानीं स्थित । स्वस्थ मनें चिलिम पीत ॥
मोर जोग पंचारती ओवाळित । घंटा वाजवित वामकरें ॥८९॥
शा त्या आरतीचे रंगीं । माधवराव बाबांचे दक्षिण भागीं ॥
यें बैसती मजही बैसविती । सन्मुख स्थिति बाबांचे ॥ ९० ॥
ग शांतमूर्ति संतमणी । बाबा बोलती मंजुळ वाणी ॥
क्षिणा काय दिधली आणी । शामरावांनीं मजमती ॥ ९१ ॥

बाबा हे शामराव येथेंच असती। दक्षिणे ऐवजीं नमस्कार देती।
हेंच पंधरा रुपये म्हणती। बाबांप्रती अर्पावे ॥ ९२ ॥
बरें असो केल्या का वार्ता। कांहीं बोललां का उभयतां ॥
काय गोष्टी केल्या त्या आतां। सांग समस्ता मजप्रती ॥ ९३
असो नमस्काराची कथा। केल्यास काय तयासीं वार्ता ॥
काय कैशा त्या समग्रता। परिसवी आतां मज प्रती ॥ ९४ ॥
गोष्ट सांगावी ही उत्कंठा। आरतीचा तो गजर मोठा ॥
परमानंद माईना पोटा। प्रवाहे ओठांतून तो ॥ ९५ ॥
बाबा जे तक्यास ओठंगले। गोष्ट ऐकावया पुढें झाले ॥
मीही पुढें वदन केलें। करूं आरंभिलें कथन तें ॥ ९६ ॥
बाबा तेथें झाल्या ज्या वार्ता। सर्वचि वाटल्या गोड चित्ता ॥
त्यांतची एक ती म्हातारीची कथा। अति नवलता तियेची ॥ ९७
शामरावें ती गोष्ट कथिता। दिसोनि आली आपुली अकळता।
जणूं त्या कथेच्या मिषें मजवरता। केलांत निश्चितता अनुग्रह॥ ९८
तंव बाबा अति उत्सुकता। म्हणती सांग मज ती समग्र कथा
काय पाहूं कैसी नवलता। अनुग्रहता ती कैसी ॥ ९९ ॥
गोष्ट होती ताजी ऐकिली। शिवाय मनांत फारचि ठसलेली ॥
बाबांस अस्खलित निवेदन केली। प्रसन्न दिसली चित्तवृत्ति॥ १०० ॥
ऐसें कथिलें सकलवृत्त। बाबा ही ऐकत देऊनि चित्त ॥
सर्वेचि मग मातें वदन। जीवीं धरीत जावें हें ॥ १०१ ॥
आणीक पुसती अति उल्हासता। कितीही गोड ऐकिली कथा ॥
बाणली का ते तव चित्ता। खरीच सार्थकता मानली का ॥ १०२ ॥

ा या कथा श्रवणांतीं । लाधलों मी निज विश्रांती ॥
ली माझे मनाची आर्ती । मार्ग निश्चिती मज कळला ॥१०३॥
बाबा वदती तथावरी । कळाच आमुची आहे न्यारी ॥
एकच गोष्ट जीवीं धरी । फार उपकारी होईल ॥ १०४ ॥
सयाचें सम्यग्विज्ञान । सम्यग् विज्ञाना कारण ध्यान ॥
ध्यानचि आत्मानुष्ठान । तेणेंच समाधान वृत्तीचें ॥ १०५ ॥
नि सर्वैषणा विनिर्मुक्त । ध्याना आणावा सर्व भूतस्थ ॥
त होईल व्यवस्थित । प्राप्तव्य प्राप्त होईल ॥ १०६ ॥
ळ जें मूर्त ज्ञान । चैतन्य अथवा आनंदघन ॥
माझें स्वरूप जाण । तें नित्य ध्यान करीगा ॥ १०७ ॥
ी न आतुडे एसें ध्यान । करी सगुण रूपानुसंधान ॥
ीं नखशिखांत मी सगुण । रात्रंदिन आणावा ॥ १०८ ॥
करितां माझें ध्यान । वृत्ती होईल एकतान ॥
ता ध्यान ध्येयाचें भान । नष्ट होऊन जाईल ॥ १०९ ॥
ही त्रिपुटी विलया जातां । ध्याता पावे चैतन्यघनता ॥
कीं ध्यानाची इतिकर्तव्यता । ब्रह्म समरसता पावसी ॥११०॥
सवी नदीचे ऐल काठीं । तिचीं पिलें पैल तटीं ॥
दूध ना ऊब केवळ दृष्टी । देई पुष्टी बाळकां ॥ १११ ॥
लियां सदां आईचें ध्यान । नलगे कांहींच करणें आन ॥
गे दुग्ध ना चारा ना अन्न । मातानिरीक्षण पोषण त्यां ॥११२॥
जें निरीक्षण कूर्मदृष्टि । ही तो प्रत्यक्ष अमृतवृष्टि ॥
लियां लाधे स्वानंदपुष्टी । ऐक्यसृष्टी गुरुशिष्यां ॥ ११३ ॥

१ श्रेयोहि ज्ञानमभ्यासात् । ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ॥
भगवद्गीता अ० १२; श्लो० १२.

होतां हा साईमुखें उच्चार । थांबला आरतीचा गजर ॥
"श्री सच्चिदानंद सद्गुरु जयजयकार" । केला पुकार सकळांनीं ॥ ११४ ॥
सरला नीरांजनोपचार । सरली आरती सविस्तर ॥
जोग मग अर्पितां खडिसाखर । बाबा करपंजर पसरिती ॥ ११५ ॥
तयांत नित्य क्रमानुसार । खडिसाखर ती ओंजळभर ।
घालिती जोग प्रेमपुरःसर । नमस्कार पूर्वक ॥ ११६ ॥
ती सबंध शर्करा माझे हातीं । बाबा रिचविती आणि वदती ॥
या साखरेवाणी होईल स्थिती । ठेवितां चित्तीं ही गोष्ट ॥ ११७ ॥
जैसी खडीसाखर ही गोड । तैसेंच पुरेल मनींचें कोड ॥
होईल तुझें कल्याण चोखड । पुरेल होड अंतरीची ॥ ११८ ॥
मग मी बाबांस अभिवंदोन । मागितलें हेंचि कृपादान ॥
हेंच पुरे मज आशिर्वचन । सांभाळून घ्या मज ॥ ११९ ॥
बाबा वदती कथा श्रवण । करा मनन आणि निदिध्यासन ॥
होईल स्मरण आणि ध्यान । आनंदघन प्रकटेल ॥ १२० ॥
एणेंपरी जें परिसिलें कानीं । तें जरी तूं धरिसील मनीं ॥
उघडेल निजकल्याणाची खनी । होईल धुणी पापाची ॥ १२१ ॥
वाऱ्याचा चालतां सोसाटा । समुद्रावरी उसळती लाटा ॥
असंख्य बुद्बुद फेणाचा साठा । आदळती काठा येऊनि ॥ १२२ ॥
लाटा बुडबुडे फेण भवरे । एका पाण्याचे प्रकार सारे ॥
हे सकळ दृग्भ्रमाचे पसारे । शांत वारे होती तों ॥ १२३ ॥
हे काय प्रकार म्हणावे झाले । किंवा म्हणावे का नाश पावले ।
जाणोनि मायेचें सर्व केलें[1] । झालें गेलें सरिसेंच ॥ १२४ ॥

१ कार्य.

तैसीच सृष्टीची घडामोड । विवेकियां न तयाचें कोड ॥
ते नाशिवंतीं न धरिती होड । साधिती जोड नित्याची ॥ १२५ ॥
महत्त्वें ज्ञानापरीस ध्यान । तदर्थ लागे यथार्थ ज्ञान ॥
होतां न वस्तूचें साद्यंत आकलन । यथार्थ ध्यान आतुडेना ॥१२६॥
सम्यग्विज्ञाना मूळध्यान । या नांव प्रत्यगात्मानुष्ठान ॥
परी जो विक्रिया रहित जाण । आणवे ध्याना कैसेनी ॥ १२७ ॥
प्रत्यगात्मा तोच ईश्वरू । आणि जो ईश्वरू तोच गुरू ॥
तिहींत भेद नाहीं अणुमात्रु । नागवे करूं जाई तो ॥ १२८ ॥
होतां निदिध्यास परिपक्वता । ध्यान ध्याता विरोन जातां ॥
निवात दीपवच्चित्ता । शांतता ते समाधी ॥ १२९ ॥
होऊनि सर्वैषणा विनिर्मुक्त । जाणूनि आहे तो सर्वभूतस्थ ॥
होतां अद्वितीयत्वें अभय प्राप्त । मग तो येत ध्यानातें ॥१३०॥
मग अविद्या कृतकर्म बंध । तुटती तटतटा तयाचे संबंध ॥
तुटती विधिनिषेध निर्बंध । भोगी आनंद मुक्तीचा ॥ १३१ ॥
आधीं आत्मा आहे कीं नाहीं । अद्वैत कीं निराळा ठायीं ठायीं ॥
कर्ता कीं अकर्ता पाहीं । साही शास्त्रें धुंडावीं ॥ १३२ ॥
आत्मैकविज्ञान हेंची । पराकाष्ठा असे ज्ञानाची ॥
मोक्ष आणि परमानंदाची । उत्पत्ती साच तेथुनी ॥ १३३ ॥
अंधास हत्तीचे वर्णनाकरितां । आणिला बृहस्पतीसमान वक्ता ॥
वक्तृत्वें स्वरूप येईना चित्ता । वाचातीता न वर्णवे ॥ १३४ ॥
वक्त्याचें वक्र श्रोत्यांचे श्रोत्र । आणितील काय गेलेले नेत्र ॥
हस्ति स्वरूपावलोकन पात्र । केवळ नेत्रचि सत्यत्वें ॥ १३५ ॥

१ ब्रह्म. सद्वस्तु. २ वाणीला अगम्य अशास.

२५० 

नेत्र नसतां कैसा हस्ती । येईल अंधाचियें प्रतीतीं ॥
तैसेच दिव्य नेत्र जैं गुरु देती । ज्ञान संवित्ति तेधवा ॥ १३६ ॥
साईस्वरूप यथार्थ ज्ञान । स्वयें जो परिपूर्ण विज्ञानघन ॥
हेंच तयाचें ध्यान अनुष्ठान । हेंच दर्शन तयाचें ॥ १३७ ॥
अविद्या काम कर्मबंधन । यांचें व्हावया अशेष मोचन ॥
नाहीं नाहीं अन्य साधन । गांठ ही बांधून ठेवाकीं ॥ १३८ ॥
साई नाहीं तुमचा वा आमुचा । तो तों सर्वभूतस्थ साचा ॥
सूर्य जैसा सकळ जगाचा । हा सकळांचा तैसाच ॥ १३९ ॥
आतां परिसा तयांचे बोल । सर्व साधारण आणि अनमोल ॥
स्मरणीं ठेवितां वेळोंवेळ । स्वार्थ सफळ सर्वदा ॥ १४० ॥
नसल्या लागाबांधा कांहीं । कोणीहि कोठेंही जातची नाहीं ॥
नरास काय पशुपक्ष्यांही । न करी कुणाही हडहड ॥ १४१ ॥
आल्यागेल्याचा आदर करी । तृषितां जल भुकेल्या भाकरी ॥
उघड्यास वस्त्र बसाया ओसरी । देतां श्रीहरी तुष्टेल ॥ १४२ ॥
कुणाला व्हावा असेल पैसा । तुझिया चित्तीं द्यावा कैसा ॥
देऊं नको परी वसवसा । श्वाना ऐसा वर्तूं नको ॥ १४३ ॥
कोणीही बोल बोलो शंभर । स्वयें नेदी कटू उत्तर ॥
धरितां सहिष्णुता निरंतर । सुख अपार लाधेल ॥ १४४ ॥
दुनिया झालिया इकडची तिकडे । आपण व्हावें न मागें पुढें ॥
ठायींच निश्चळ राहून रोकडें । कौतुक तेवढें पहावें ॥ १४५ ॥
तुम्हाआम्हांमधील भिंत । पाडून टाका पहा समस्त ॥
मग जाण्यायेण्यास मार्ग प्रशस्त । अति निर्धास्त होईल ॥१४६॥
मी तूं पणाची भेदवृत्ति । हेच ते गुरुशिष्यांतर्गत भिंती ॥
ते न पाडितां निश्चिती । अभेद स्थिती दुर्गम ॥ १४७ ॥

अल्ला मालिक अल्ला मालिक। वाली न त्यावीण कोणी आणीक॥
करणी तयाची अलोलिक। अमोलिक अकळ ती ॥ १४८ ॥
तो जें करील तेंच होईल। मार्ग तयाचा तोच दावील ॥
क्षण न लागतां वेळ येईल। मुराद[1] पुरेल मनींची ॥ १४९ ॥
ऋणानुबंधाचिया गांठी। भाग्यें आम्हां तुम्हां भेटी ॥
धरूं परस्पर प्रेम पोटीं। सुख संतुष्टी अनुभवूं ॥ १५० ॥
कोण येथें अमर आहे। कृतार्थ तो जो परमार्थ लाहे ॥
जोंवरीं श्वासोश्वास वाहे। तोंवरी राहे जीव मात्र ॥ १५१ ॥
कानीं पडतां हें कृपावचन। सुखावलें माझें आतुर मन ॥
तृषार्त मी लाधलों जीवन। आनंदसंपन्न जाहलों ॥ १५२ ॥
असेल गांठीं प्रज्ञा अतुळ। तैसीच श्रद्धा मोठी अढळ ॥
परी जोडाया साईसम गुरुबळ। दैवचि सबळ आवश्यक ॥१५३॥
पाहूं जातां यांतील सार। भगवंत बोलिला हाचि निर्धार ॥
'ये[2] यथा मां' हेचि उद्गार। अखिल भार कर्मावरी ॥ १५४ ॥
यथा कर्म यथा श्रुत। जैसा अभ्यास तैसें हित ॥
हेंचि या अध्यायांतील इंगित। हेंच बोधामृत येथीचें ॥ १५५ ॥
"अनन्याश्चिंतयंतो माम्"। हेंच भगवद्गीता वर्म ॥
ऐशा नित्य युक्तांचा योगक्षेम। चालवी प्रकाम गोविंद ॥१५६॥
हा गोड उपदेश ऐकून। उभें राही स्मृतीचें वचन ॥
"देवान्भावयतानेन"। मगते तुज लागून कळवळती ॥ १५७ ॥
तुम्ही जोर काढूं लागा। दुधाची काळजी सर्वस्वीं त्यागा ॥
वाटी घेऊन उभाच मी मागां। पृष्ठभागा आहे कीं ॥ १५८ ॥

१ अभीष्ट. २ 'ये यथा मां प्रपद्यंते.'

म्हणाल जोर म्यां काढावे । दुधाचे प्याले तुम्ही रिचवावे ॥
हें तो आपणा नाहीं ठावें । दक्ष असावें कार्यार्थी ॥ १५९ ॥

हे बाबांची प्रतिज्ञा वाणी । प्रमाण मानूनि वर्ततील जे कोणी ॥
इह परत्र सुखाची खाणी । गांठिली तयांनीं जाणावें॥ १६० ॥

आतां आणीक विनवितों श्रोता । क्षणैक सुस्थीर करावें चित्ता ॥
परिसा एक स्वानुभव कथा । निश्चय पोषकता साईची ॥ १६१ ॥

सद्वृत्तीचें करितां नियमन । महाराज देती कसें उत्तेजन ॥
परिसा ओठ हालविल्या वांचून । अनुग्रहदान साईचें ॥ १६२ ॥

भक्तें अनन्य शरण व्हावें । कौतुक भक्तीचें अवलोकावें ॥
मग साईच्या कळेचे नवलावे । अनुभवावे नित्य नवे ॥ १६३ ॥

असो प्रातःकाळींचे प्रहरीं । सुषुप्तींतून येतां जागरीं ॥
सद्वृत्तीची उठतां लहरी । तीच निर्धारीं वाढवावी ॥ १६४ ॥

त्याच वृत्तीचा परिपोष । होतां होईल अति संतोष ॥
बुद्धिही पावेल विकास । होईल मनास प्रसन्नता ॥ १६५ ॥

ही एक आहे संत उक्ती । वाटलें तियेची घेऊं प्रचीती ॥
अनुभवें घडली मनास शांती । नवल चित्तीं वाटलें ॥ १६६ ॥

शिरडी सारिखें पवित्र स्थान । गुरुवारासम मंगल दिन ॥
रामनामाचें अखंड आवर्तन । करावें मन जाहलें ॥ १६७ ॥

बुधवारीं रात्रीं शय्येवरी । देह निद्रावश होई तोंवरी ॥
मन रामस्मरणाभीतरीं । घालून अंतरीं राखिलें ॥ १६८ ॥

प्रातःकाळीं जाग येता । रामनाम स्मरलें चित्ता ॥
मग ते ऐसी वृत्ती उठतां । जिव्हेची सार्थकता जाहली ॥ १६९ ॥

१ यथार्थ प्यावे.

निश्चयें केली मनाची धारणा । सारोनिया शौचमुखमार्जना ॥
निघालों साई प्रातर्दर्शना । प्राप्त सुमना घेऊनि ॥ १७० ॥
सोडूनि दीक्षितांचें घर । पडतां बुट्टीच्या वाड्याबाहेर ॥
पद एक मधुर औरंगाबादकर । म्हणतां सुंदर ऐकिलें ॥ १७१ ॥
त्याची त्या समयोचितता । ओंवीरूपें कथूं जातां ॥
जाईल मूळाची स्वारस्यता । होईल विरसता श्रोतियां ॥ १७२ ॥
म्हणून तें पदचि समूळ । अक्षरें अक्षर गातों मी सकळ ॥
तेंच आनंदित होतील प्रेमळ । उपदेश निर्मळ मूळपदीं ॥ १७३ ॥

## ॥ पद ॥

गुरुकृपांजन पायो मेरे भाई । रामबिना कछू मानत नाहीं ॥ धृ० ॥
अंदररामा बाहेररामा । सपनेमे देखत सीतारामा ॥
जागत रामा सोवत रामा । जहां देखे वहां पुरन कामा ॥
एका जनार्दनीं अनुभव नीका । जहां देखे वहां राम सरीखा ॥गुरु०॥
मींच मनानें केलें निश्चित । नियमावें रामनामीं चित्त ॥
तथा जों प्रारंभ होत । पद हें देत दृढता तया ॥ १७४ ॥
तों मनास झालें बोधन । या मन्निश्चयांकुरा लागून ॥
साई समर्थ करुणाघन । पदांबुसेचन करिती कां ॥ १७५ ॥
घेऊनियां हातीं तंबुरी । साईसन्मुख अंगणाभीतरीं ॥
औरंगाबादकर उंच स्वरीं । म्हणतां ही लकेरी परिसिली ॥ १७६ ॥
औरंगाबादकर बाबांचा भक्त । मजसम बाबांचे पाईं अनुरक्त ॥
असतां अनेक पदें मुखोद्गत । हेंच कां स्फुरत ते वेळीं ॥ १७७ ॥
माझें मनोगत कोणा न ठावें । हेंच पद कां तें गाईलें जावें ॥
ऐसें बाबांनां सूत्र हालवावें । स्फुरण व्हावें तैसेच ॥ १७८ ॥

---

१ मूळपदाची. २ प्रेमळ श्रोतेजन.

आम्ही सकळ केवळ बाहुलीं । सूत्रधार साई माऊली ॥
स्वयें न बोलतां उपासना भली । हातीं दिधली अचूक ॥ १७९ ॥
अंतरीची माझी वृत्ती । प्रतिबिंबली जणु बाबांचे चित्तीं ॥
एणें मार्गें प्रत्यक्ष प्रतीति । बाबें निश्चितीं दाखविली ॥ १८० ॥
केवढी या नामाची महती । वर्णिलीसे संत महंतीं ॥
काय म्या पामरें ती वानावी किती । स्वरूपप्राप्ति येणेंची ॥१८१॥
हीं दो अक्षरें उलटीं स्मरला । तो कोळी बाटपाड्याही उद्धरला ॥
वाल्याचा वाल्मीक होऊनि गेला । वाक्सिद्धी पावला नवलाची॥१८२॥
'मरा मरा' उलटें म्हणतां । राम प्रकटला जिव्हेवरता ॥
जन्मा आधींच अवतारचरिता । जाहला लिहिता रामाचें ॥१८३॥
रामनामें पतीत पावन । रामनामें लाभ गहन ॥
रामनामें अभेद भजन । ब्रह्म संपन्न या नामें ॥ १८४ ॥
रामनामाच्या आवर्तनें । उठेल जन्ममरणाचें धरणें ॥
एका रामनामाचिया स्मरणें । कोटीगुणें हे लाभ ॥ १८५ ॥
जेथें रामनामाचें गर्जन । फिरे तेथें विष्णूचें सुदर्शन ॥
करी कोटी विघ्नांचें निर्दळण । दीन संरक्षण नाम हें ॥ १८६ ॥
साईंस उपदेशा नलगे स्थळ । नलगे समय काळवेळ ॥
बसतां उठतां चालतां निखळ । सहजचि सकळ उपदेश ॥ १८७ ॥
ये विषयींची गोड कथा । सादर श्रवण कीजे श्रोतां ॥
प्रत्यया येईल साईंची सदयता । तैसीच व्यापकता त्यांची ॥१८८॥

१ वाल्मीकी. २ रस्त्यानें जाणाऱ्यायेणाऱ्यास गांठून लुटणार. ३ नित्य मारहाण करण्याचा धंदा असल्यामुळें त्याच्या जिभेवर तात्काळ चढेल असाच 'मरामरा' हाच मंत्र महर्षि नारदांनीं या कोळ्याला दिला होता. ४ रामजन्मास येण्याचें आधींच.

एकदां एक भक्तश्रेष्ठ । कोणाची कोणी बोलतां गोष्ट ॥
स्वयें होऊनि कुतर्काक्रुष्ट । निंदा सन्निष्ट जाहले ॥ १८९ ॥
गुण राहिले एकीकडा । निंदा प्रवाहे मुखीं दुथडा ॥
गोष्टीचा होवोनिया चुथडा । आलाकीं उंभडा पैशुन्यां ॥ १९० ॥
असल्या कांहीं तरी कारण । असल्या कोणाचें गर्ह्य आचरण ॥
करावें सन्मुख तयाचें प्रबोधन । कींव जाणून तयाची ॥ १९१ ॥
निंदा कधींही करूं नये । हें तों प्रत्येक जाणे स्वयें ॥
परी न वृत्ती जैं दाबिली जाये । ती ना समाये पोटांत ॥ १९२ ॥
तेथून मग येई ती कंठीं । कंठांतून जिव्हेचे तटीं ॥
तेथून हळूहळू ओठीं । सुख संतुष्टी प्रवाहे ॥ १९३ ॥
नाहीं दुजा निंदकापरी । त्रिभुवनांतही कोणी उपकारी ॥
निंदी जयाची तयाचें करी । परोपरी कल्याण ॥ १९४ ॥
मळ काढिती कोणी रिठ्यानें । कोणी साबणादिकीं साधनें ॥
कोणी शुद्ध निर्मल जीवनें । निंदक जिव्हेनें काढिती ॥ १९५ ॥
स्वीय मानसिक अधोगती । परोपकारार्थ जे साहती ॥
अवर्णनीय ती महदुपकृती । निंदक निश्चिती अति वंद्य ॥ १९६ ॥
पावलो पावलीं सावध करिती । निंदामिषें दोष कळविती ॥
भावी परांचे अनर्थ टाळविती । उपकार हे किती वानूं मी ॥१९७॥
म्हणुतां परी साधुसंतीं । वर्णिलीसे जयांची महती ॥
त्या निंदक वृन्दाप्रती । करितों मी प्रणति साष्टांग ॥ १९८ ॥
झाली श्रोतियां अत्यंत चिळसी । निंदकही निघाले बहिर्दिशीं ॥
मंडळी चालली मशीदीसी । दर्शनासी बाबांच्या ॥ १९९ ॥
बाबा पूर्ण अंतर्ज्ञानी । देती वेळींच भक्तांस शिकवणी ॥
पुढें कैसा प्रकार तयांनीं । आणिला घडवूनी तें परिसा ॥ २०० ॥

१ उत, २ निंदेस, ३ शौचासाठीं.

२९३

मंडळीसह जातां लेंडियेसीं । बाबा पुसती तया भक्ताविसीं ॥
मंडळी म्हणे ओढियापासीं । बहिर्दिशेसीं गेलेती ॥ २०१ ॥

कार्यक्रम आटपल्यावरी । लेंडीवरून परतली स्वारी ॥
ओढियावरून भक्तही माघारीं । फिरले घरीं जावया ॥ २०२ ॥

भेटी होतां परस्परां । घडला जो वृत्तांत तये अवसरां ॥
विनवीं श्रोतयां जोडूनि करा । तो अवधारा सादर ॥ २०३ ॥

तेथेंच एका कुंपणा शेजारीं । यथेष्ट विष्ठा भिष्टान्नावरी ॥
एक ग्राम सूकरी भिटक्या मारी । बाबा निजकरीं दाविती त्यां॥२०४॥

पहा त्या जिभेला काय गोडी । जना लोकांची विष्ठा चिवडी ॥
बंधु स्वजनावर चडफडी । यथेष्ट फेडी निज हौस ॥ २०५ ॥

बहुत सुकृताचिये जोडी । आला नर जन्म ऐसा जो दवडी ॥
तया आत्मघ्ना ही शिरडी । सुख पखडी काय दे ॥ २०६ ॥

ऐसें बोलत बाबा गेले । भक्त अंतरीं बहुत खोंचले ॥
प्रातर्वृत्त सर्व आठवलें । बोलते टोचले बहु वर्मीं ॥ २०७ ॥

असो बाबा तों परोपरीं । भक्तां बोधिती प्रसंगानुसारीं ॥
यांतील सार सांठविल्या अंतरीं । कायहो दूरी परमार्थ ॥ २०८ ॥

असेल जरीं माझा हरी । तरीं मज देईल खाटल्यावरी ॥
म्हणीची या सत्यता खरी । परि ती अन्न आच्छादनीं ॥ २०९ ॥

परी ती जो परमार्थी लावील । परमार्थ सर्वस्वी नागवील ॥
जैसें जो करील तैसें भरील । अमोल हे बोल बाबांचे ॥ २१० ॥

---

१ गांवचा ओढा जेथें श्री बाबा रोज सकाळीं ८।९. वाजतां प्रातर्विधीस म्हणून जात. २ बाबांची स्वारी. ३ स्वतःचा घात करणाऱ्याला. ४ म्हण अन्न व वस्त्र एवढयाच पुरती लागू आहे.

आणीकही बाबांचे बोल । परिसतां देतील स्वानंदा डोल ॥
भाव भक्तीची असलिया ओल । मुळें सखोल जातील ॥ २११ ॥
जल स्थल काष्ठ प्रदेशीं । जनीं वनीं देशीं विदेशीं ॥
संचलों मी तेजीं आकाशीं । एकदेशी मी नव्हें ॥ २१२ ॥
औट हात देह परिमीत । हेच मद्‌व्याप्ति जे मानित ॥
त्यांस करावया निभ्रांत । मूर्तिमंत मी झालों ॥ २१३ ॥
निष्कामत्वें अनन्य भजन । करिती जे माझें रात्रंदिन ॥
ते प्रत्यक्ष माझें मीपण । दुजेपण विरहीत ॥ २१४ ॥
गूळ राहील गोडी वेगळा । सागर लाटां पासाव निराळा ॥
तेजा सोडोनि राहील डोळा । मजवीण भोळा भक्त तैं ॥ २१५ ॥
चुकावा जन्ममरणावर्त । ऐसें जयाचे मनीं निश्चित ॥
प्रयत्नें रहावें धर्मवंत । स्वस्थ चित्त सर्वदां ॥ २१६ ॥
त्यागावे तेणें बोल वर्मी । कोणास छेदूं नये मर्मीं ॥
सदा निरत शुद्ध कर्मीं । चित्त स्वधर्मीं ठेवावें ॥ २१७ ॥
माझीये ठायीं मन बुद्धि । समर्पा स्मरा मज निरवधि ॥
देहाचें कांहीही होवो कधीं । भय त्रिशुद्धि त्या नाहीं ॥ २१८ ॥
जो पाहे मजकडे अनन्य । वर्णी परिसे मत्कथा धन्य ॥
न धरी भावना मदन्य । चित्त चैतन्य लाधेल ॥ २१९ ॥
माझें नांव घ्या मज शरण या । हें तों सांगत गेले अत्रयियां ॥
परी मी कोण हें जाणावया । श्रवण मनन आज्ञापिलें ॥ २२० ॥
एकास भगवन्नाम स्मरण । एकास भगवल्लीला श्रवण ॥
एकास भगवत्पाद पूजन । आनांन नियमन आनांना ॥ २२१ ॥
कोणास अध्यात्म रामायण । कोणास ज्ञानेश्वरी पुरश्चरण ॥
कोणास हरिवरदा पारायण । गुरु चरित्रावलोकन कोणातें ॥ २२२ ॥

१ वेगवेगळें. २ वेगवेगळ्या अधिकारी जनांस.

२०५

कोणा बसविती पायाजवळीं । कोणास खंडोबाचे देउळीं ॥
कोणाच्या विष्णु सहस्त्र नामावळी । वांचिती गळीं कळकळीनें ॥२२३॥
कोणांस उपदेशिती रामविजय । कोणासि ध्यान नाममहात्म्य ॥
कोणासी छांदोग्य गीतारहस्य । विश्वासें स्वारस्य अनुभविजे ॥२२४॥
कोणास कांहीं कोणास कांहीं । दीक्षा प्रकारा सीमाच नाहीं ॥
कोणा प्रत्यक्ष कोणा दृष्टांतांहीं । उपदेश नवलाई अपूर्व ॥ २२५ ॥
भक्त अठरा पगड जाती । धांव धांवून दर्शना येती ॥
जयांस मद्यावर अति प्रीती । स्वप्नींही जाती तयांचे ॥ २२६ ॥
वक्षस्थळावरीं बैसती । हातीपायीं छाती दडपिती ॥
स्पर्शाचा कानास खडा लावविती । भोंक येती तंव जाती ॥ २२७
लग्नगृहीं भिंती वरती । ज्योतिषी जेंसें हरिहर काढिती ॥
'गुरुर्ब्रह्मादि' मंत्र लिहिती । कोण्या भक्तार्थी स्वप्नांत ॥ २२८ ॥
कोणी चोरून लाविता आसनें । करूं आदरिता हठयोग साधनें ॥
बाबांस कळे तें अंतर्ज्ञानें । अचूक बाणें खोंचिती ॥ २२९ ॥
कोणा अपरिचिता हातीं धरून । निरोप देती पाठवून ॥
स्वस्थ न बसवेका भाकर खाऊन । मवृगी धरून रहावें ॥ २३० ॥
कोणास प्रत्यक्ष निक्षून सांगती । आमुचि नौ मोठी कडवी जाती ॥
सांगून पाहूं एका दो वक्तीं । शेवटची गती बहु कठिण ॥ २३१ ॥
सांगू एकदा सांगू दोनदा । न करी जो गुमान आमुचे शब्दा ॥
त्या मग पोटचे पोरास सुद्धां । चिरून द्विधा फेकूं कीं ॥ २३२ ॥
महानुभाव ते महामति । काय मी पामर नं चमत्कृति ॥
कोणा दे ज्ञानप्राप्ति विरक्ति । सद्भाव भक्ती कवणा दे ॥ २३३ ॥
कोणास कांहीं व्यवहारीं प्रशस्त । वर्तनाची लावीत शिस्त ॥
चुटका एक उदाहरणार्थ । श्रोतृवृन्दार्थ मी कथितों ॥ २३४ ॥

---

१ मद्यस्पर्शाचा. २ इतःपर मद्यास शिवणार नाहीं म्हणून हातावर हात. ३ गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुर्गुरुर्देवो महेश्वरः । गुरुस्साक्षात्परब्रह्म तस्मै श्रीगुरवे नमः हा मंत्र.

कदां बाबा भर दुपारीं । काय आलें नकळे अंतरीं ॥
धाकृष्णीच्या घराशेजारीं । आली स्वारी अवचिता ॥ २३५ ॥
मवेत होते कांहीं जन । म्हणती आणाआणा रे निसेण ॥
ीं एकानें तात्काळ जाऊन । शिडी तें आणून ठेविली ॥ २३६ ॥
ाबा ती लावविती घरावरी । स्वयें चढती छपरावरी ॥
ोणा न ठावें काय अंतरीं । योजना तरी हे काय ॥ २३७ ॥
ामन गोंदकराचे घरा । शिडी लावविली तें अवसरा ॥
ढले शिडीवरूनि छपरा । स्वयें झरझरा श्रीसाई ॥ २३८ ॥
थून राधाकृष्णीचें छपर । शेजारींच घरासीं घर ॥
ीं वळंघूनि गेले सत्वर । काय हा चमत्कार कळेना ॥ २३९ ॥
ाधाकृष्णाबाईस मात्र । तेच संधीस मोठा प्रखर ॥
ाला होता शीतज्वर । अत्यंत अस्थिर त्या होत्या ॥ २४० ॥
ाघे दोबाजू धरूं लागत । तेव्हांच बाबा चालूं सकत ॥
यें एवढें असतां अशक्त । कोठून सामर्थ्य आलें हें ॥ २४१ ॥
ोच दुसरे बाजूची वळचण । वळंघोनियां तेथील उतरण ॥
ेंही लाववोनि तीच निसण । आले उतरूनि खालतीं ॥ २४२ ॥
य लागतां धरेसीं । दोन रुपये निसणवाल्यासीं ॥
धले बाबांनीं अति दक्षतेसी । अविलंबितेसीं तात्काळ ॥ २४३ ॥
ाविली दों ठायीं शिडी । हीच कायती श्रमाची मोढी ॥
र्थ बाबा भरपाई येवढी । करिती फेडी तयाची ॥ २४४ ॥
नांस साहजीं जिज्ञासा । निसण वाल्यास इतुका पैसा ॥
बा देती तरी हा कैसा । म्हणती हें पुसा तयांस ॥ २४५ ॥
ला एकानें तेधवां धीर । बाबा देती प्रत्यूत्तर ॥
णाच्यांही श्रमाचा भार । फुकट लवभार घेऊं नये ॥ २४६ ॥

१ राधाकृष्णाबाईस श्री साईबाबा राधाकृष्णी असें म्हणत. २ शिडी.

कोणाहीपासून घ्यावें काम । परी जाणावे तयाचे श्रम ॥
लावावा जीवास ऐसा नियम । फुकट परिश्रम घेऊं नये ॥ २४७ ॥
कोणी जाणावें खरें इंगीत । बाबा हें कां ऐसें करीत ॥
हें तों तयांचें तयां अवगत । संतान्तर्गत अति गूढ ॥ २४८ ॥
परीसतां मुखींचे उद्गार । तेच सर्वस्वीं आम्हां आधार ॥
ठेवितां तैसा वर्तन निर्धार । चालेल व्यवहार सुरळीत ॥ २४९ ॥
असो पुढील अध्यायाची गोडी । याहून आहे अती चोखडी ॥
एका मोलकरिणीची पोर भावडी । कोडें उलगडी श्रुतींचें ॥ २५० ॥
गणुदास प्रासादिक हरिदास । उपकार करावया प्राकृत जनास ॥
ईशावास्य भाषांतरास । करावया कास घातली ॥ २५१ ॥
साईकृपें ग्रंथ लिहिला । परि कांहीं गूढार्थ राहिला ॥
तेणें मनास संशय पडला । कैसा फेडिला बाबांनीं ॥ २५२ ॥
बाबा वदत शिरडींत बसून । पारल्यास जें जासील परतोन ॥
काकांच्या घरची मोलकरीण । शंका समाधान करील ॥ २५३ ॥
ईशावास्य पद्म परिसरीं । रुंजी घालील वाग्देवी भ्रमरी ॥
ते आमोद सेविती कळाकुसरी । श्रोतां चतुरीं भोगिजे ॥ २५४ ॥
असो पुढील अध्यायीं हें कथन । कर्ता करविता साई दयाघन ॥
श्रोतां यथावकाश श्रवण । करावें कल्याण होईल ॥ २५५ ॥
पंत हेमाड साईस शरण । तैसाच भूतीं भगवंतीं लीन ॥
श्रोतां देणें अवधान दान । साई निवेदन गोड हें ॥ २५६ ॥
इति श्री संतसज्जन प्रेरिते । भक्त हेमाडपंत विरचिते ॥
श्री साईसमर्थ सच्चरिते । मदनुग्रह नाम एकोनत्रिंशोध्यायगोडहाः ।

इति श्री साईनाथार्पणमस्तु शुभं भवतु ॥

१ दासगणूस बोलले. २ श्री. हरी सिताराम दीक्षित यांजला बाबा काका या नांवानें संबोधीत. ३ सभोंवर. ४ वास सेवन करण्याची.

## आख्यान-रत्न-माला, नांदेड.


या मालेंत अर्वाचीन कवींनीं रचलेलीं कीर्तनोपयोगी आख्यानें दिलीं जातील. ह. भ. प. संतकवी **दासगणू** महाराजांचीही प्रेमळ व प्रासादिक आख्यानें येतील.

वर्षांतून सहा पुस्तकें निघतील. पुस्तकाचा आकार डेमी अष्टपत्री, पृष्ठ सं. ४८ प्र. पु. किं. ८ आणे.

एक रुपया प्रवेश फी भरणारास पाऊणपट किंमतींत पुस्तक मिळेल. एकदम सहा पुस्तकांची किं. प्र. फीसह ३। रु.

**ग. अ. सराफ, नांदेड.**

---

## श्री साईनाथ भजनमाला

### सुधारून वाढविलेली आवृत्ति.

मालेचे कर्ते रा. रघुनाथराव तेंडुलकर यांच्या निधनानंतर आतां मालेची पुनरावृत्ती छापविणें नाहीं. साईभक्तांनीं माला मागविण्याची त्वरा करावी, कारण प्रती फार थोड्या शिल्लक राहिल्या आहेत.

**सावित्रीबाई तेंडुलकर.**

माला मिळण्याचा पत्ता:--

**श्रीमति सावित्रीबाई तेंडुलकर,**

रंगाऱ्याची चाळ, वांद्रें

बी. बी. सी. आय. रेल्वे.


२५६

१८२८

(२)

श्रीसाईगाथामृत प्रकरण ६ वें

# भक्त श्रेष्ठ हेमाडपंत

लेखक–नागेश वासुदेव गुणाजी

## श्रीसाईसच्चरितकार गोविंद रघुनाथ दाभोळकर

( इ. स. १८५९–१९२९ )

श्री साईबाबांची भक्तसंख्या अलीकडे अतोनात वाढलेली आहे. इतकेंच नव्हे, तर ती :दिवसेंदिवस अधिकाधिक वाढत आहे. श्री बाबांच्या अद्भुत लीलांची आणि दिव्य उपदेशाची, खऱ्या, अधिकृत आणि काव्यमय वाणींत उपदेश देणारा उत्तमोत्तम ग्रंथ म्हणजे 'श्रीसाईसच्चरित' हा होय. बहुतेक बाबांचे भक्त या सद्ग्रंथाचें नित्य पठण आणि पारायण करीत असतात. अशा या सद्ग्रंथाची आणि त्या ग्रंथाचे कर्ते भक्तश्रेष्ठ हेमाडपंत यांची माहिती या प्रकरणांत देण्याचें योजिलें आहे. प्रथम या सद्ग्रंथाची माहिती देऊं.

### श्रीसाईसच्चरित – आधुनिक गुरुचरित्र

गुरुचरित्र हा ग्रंथ महाराष्ट्रांत सर्वांच्या परिचयाचा आहे. श्री. दत्तात्रेयाचे भक्त या ग्रंथाचें नित्य परिशीलन आणि पारायण करीत असतात. या ग्रंथांत श्रीदत्ताचे अवतार श्रीपाद श्रीवल्लभ आणि श्रीनृसिंह सरस्वती यांच्या लीला आणि इतर अनेक विषय सरस्वती गंगाधर नांवाच्या भक्तानें वर्णिलेल्या आहेत. श्री. ह. भ. प. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांच्या मतें, श्रीपाद श्रीवल्लभ यांचा अवतार शके १३०० सुमारास आणि श्रीनृसिंह सरस्वती यांचा अवतार शके १३३० ते १३८० चे सुमारास झाला. आणि त्यानंतर सुमारें शंभर वर्षांनीं म्हणजे शके १४८० चे सुमारास गुरुचरित्र ग्रंथाची मराठी ओवीबद्ध रचना झाली असावी. ( मराठी वाङ्मयाचा इतिहास खंड २ रा, पान ११६ ) त्यानंतर अलीकडे श्रीदत्तात्रयाचे दुसरे अवतार झाले. त्यांतील प्रमुख म्हणजे निजामी मुलुखांतील श्रीमाणिकप्रभु आणि सोलापूर जिल्ह्यांत श्री अक्कलकोटकर महाराज आणि शेवटचे, श्री अहमदनगर जिल्ह्यांत शिरडी येथील श्रीसाईबाबा हे होत. श्रीसाईबाबांनीं सन १९१८ सालीं महासमाधि घेतली.

कांहीं साईभक्तांच्या मतें श्रीबाबा हे अक्कलकोटकर महाराज यांचे चालू अवतार होते. याला कांहीं सबळ पुरावाहि आहे.



२५४

(१) श्रीसाईसच्चरित अध्याय ५ यांत वर्णन केलेली पादुकास्थान कथा, ज्यांत अक्कलकोटकर महाराज भक्त भाई यांना 'उद्यां जाणार तों आज स्वप्न। स्वामीसमर्थ आज्ञापन। शिरडीस सांप्रत मम स्थान। तेथें तूं प्रस्थान करीं गा॥ अ. ५–५६' असा झालेला दृष्टांत; तसेंच (२) श्रीसाईसच्चरित, अध्याय २६ यांत वर्णत केलेली कथा ज्यात श्रीहरिश्चंद्र पितळे यांच्या मुलाची अपस्मारव्यथा नाहींशी करून त्याला 'बापू तुजला पूर्वी दोन। दिधले ती म्यां त्यांत हे तीन। ठेवूनि यांचें करी पूजन। कृत कल्याण होईल '(अ. २६–९०)' असें वर्णन आहे. पुढें चौकशीं अंतीं हे दोन रुपये श्रीअक्कलकोटकर महाराजांकडून मिळाले होते असे श्री. हरिश्चंद्र पितळेच्या मातोश्री कडून समजलें. (३) श्रीसाईसच्चरित, अध्याय ३३ यांत बाबांच्या एका अद्‌भुत लीलेचें—जामनेरच्या चमत्काराचें वर्णन आहे. त्यांत बाबांनीं अडकराची आरति माधवराव देशपांडे यांचेकडे उतरून घेऊन ती उदी समवेत 'बापुगीर' गोसाव्याबरोबर जामनेरास पाठविली आहे. ह्यांत सदर आरतीचा चवथा चरण असा आहे कीं— 'कलियुगीं अवतार। सगुणब्रह्म साचार। अवतीर्ण झालासे। स्वामी दत्तदिगंबर। दिगंबर॥' यावरून ही आरति बाबांना मान्य होती आणि ते दत्तावतार होते ही गोष्ट त्यांनीं मान्य केलेली दिसते.

वर नमूद केल्याप्रमाणें सरस्वती गंगाधर यांनीं गुरुचरित्राच्या ५३ अध्यायांत श्रीपाद श्रीवल्लभ आणि श्रीनरसिंह सरस्वती या दोन दत्तावरच्या लीला वर्णन केल्या आहेत, तसेंच गोविंद रघुनाथ ऊर्फ अण्णासाहेब दाभोळकर यांनीं दत्तावतार श्रीसाईबाबांच्या लीला, 'श्रीसाईलीला' मासिकांत वर्ष पहिलें शके १८४५ च्या अंकापासून सुरुवात करून सातव्या वर्षी (शके १८५२) पुऱ्या केल्या आहेत. त्यानंतर ह्या सर्व लीला 'श्रीसाईसच्चारित' या ग्रंथांत स्वतंत्र ग्रंथरूपानें प्रसिद्ध झालेल्या आहेत आणि आतां या ग्रंथाच्या अनेक आवृत्त्या शिरडी संस्थान कमिटीनें प्रसिद्ध केलेल्या आहेत. गुरु चरित्राप्रमाणें या साईसच्चरिताचे ओवीबद्ध ५३ अध्याय आहेत आणि हा ग्रंथहि नित्यपाठाच्या आणि पारायणाच्या योग्यतेचा आहे. गुरुचरित्रांत वर्णिलेल्या लीला अगर कथा सरस्वती गंगाधराच्या प्रत्यक्ष माहितीच्या आहेत किंवा कसें याबद्दल त्या ग्रंथांत कोठें खुलासा नाहीं. श्रीगुरूच्या एका शिष्यानें—सिद्धानें एका नामधारक नामक शिष्याला त्या सांगितल्या आहेत. म्हणजे सिद्ध—नामधारक संवादरूपानें वर्णिलेल्या आहेत. त्या लीला घडून आल्यानंतर बऱ्याच वर्षांनीं—किती वर्षांनीं हें नक्की सांगतां येणें शक्य नाहीं—त्या पोथीरूपानें ग्रथित केल्या असाव्यात. पण साईसच्चरितकार अण्णासाहेब दाभोळकर (हेमाडपंत) यांनीं साईबाबाच्या बऱ्याचशा लीला प्रत्यक्ष पाहिल्या आहेत आणि कांहीं लीला, इतर भक्तांकडून ऐकून त्यांचे टिपण ठेवून (श्रीसाईबाबांच्या आज्ञेप्रमाणें 'दप्तर ठेवून') त्यावरून त्यांनीं हा 'साईलीला' ग्रंथ बाबांच्या कृपेनें व आज्ञेनें तयार केलेला आहे. यामुळें यांतील सर्व कथा

आधुनिक ऐतिहासिक आणि सत्य आहेत याबद्दल शंका घेण्याचें बिलकुल कारण श्री. अण्णासाहेबांनीं अनेक साधुसंतांचे ग्रंथ वाचले असल्यामुळें आणि एकनाथी भागवत हा त्यांचा नित्य पाठांत असल्या-मुळें साईसच्चरित हा ग्रंथ उत्तम वठला आहे आणि त्यावर एकनाथी भागवताची छाप पडलेली आहे असें दिसून येतें.

## साईसच्चरिताचें वैशिष्टय

गुरुचरित्रांतले कांहीं भाग–वेद विस्तार २६ वा अध्याय, कर्मविकास २८ वा अध्याय, रुद्राध्याय ३४ वा अध्याय, गृहस्थाश्रमी पुरुषाचे आचारधर्म व आन्हिक, अध्याय ३६, ३७ वगैरे भाग विचारकरणीय असले तरी, ते फार कठीण वाटतात. कर्मकांडा-वर तर गुरुचरित्राचा मुख्य भर आहे. आणि त्याचें सविस्तर वर्णनहि देण्यांत आलें आहे. त्या कर्मकांडांतील सर्व नियम त्या काळींहि पाळणें कठीणच होतें. अस्सल देवभक्त ज्यांना श्रीदत्ताचें प्रत्यक्ष दर्शन झालें आहे असें म्हणतात, त्यांचेकडूनहि ह्या नियमांप्रमाणें आचरण होत नाहीं, साईसच्चरितांत असा कठीण आचार कांहीं नसून सध्याच्या काळाला योग्य असा सहजसुलभ भक्तिमार्गच सांगितलेला आहे. तेव्हां हा ग्रंथ आजच्या काळीं योग्य व अनुरूप असाच आहे.

आतां प्रथम श्री. अण्णासाहेब दाभोळकरांचें संक्षिप्त जीवनचरित्र देऊन त्यांना श्रीबाबांचें प्रथम दर्शन कसें घडलें, 'हेमाडपंत' नामाभिधान कसें प्राप्त झालें, श्रीसाईसच्चरित ग्रंथाची निर्मिति कशी झाली आणि त्यांना श्रीबाबांचे अनुभव कसे कसे येत गेले हें सांगणार आहें.

## संक्षिप्त जीवनचरित्र

श्री. अण्णासाहेब दाभोळकरांचा जन्म ठाणें जिल्ह्यांत केळवें–माहीम या गांवीं कुडाळ देशस्थ(आद्य)गौड सारस्वत ब्राह्मण ज्ञातींत एका गरीब कुटुंबांत इ. स. १८५९ सालीं झाला. त्यांचा आजा व पिता हे धार्मिक व देशभक्त होते. त्यांचे घरची स्थिति गरीबीची असल्यामुळें त्यांचें मराठी प्राथमिक शिक्षण त्यांचें जन्म-गांवीं झालें आणि यापुढील इंग्रजी शिक्षण पांचव्या इयत्तेपर्यंत पुणें येथें झालें. प्रति-कूल परिस्थितीमुळें त्यांना पुढील शिक्षण घेतां आलें नाहीं. त्यावेळची पब्लिक सर्व्हिसची परीक्षा मात्र ते पास झाले. तरुणपणीं त्यांना प्रथम आपल्या गांवीं शाळामास्तरची नोकरी— करावी लागली. त्यांचा स्वभाव, हुषारी आणि उत्कृष्ट कामगिरी, हीं त्यावेळचे कुलाबा जिल्ह्याचे मामलेदार श्री. साबाजी चिंतामण चिटणीस यांचे लक्षांत आल्या-मुळें त्यांनी त्यांना तलाठ्याच्या जागेवर नेमले. तेथून त्यांना इंग्रजी कारकुनाची जागा, नंतर अव्वल कारकुनाची जागा मामलेदार कचेरींत मिळाली. नंतर त्यांना फॉरेस्ट सेटलमेंट ऑफिसर म्हणून नेमलें. त्यानंतर भडोच मुक्कामीं त्यांना दुष्काळ कामावर स्पेशल आफिसर म्हणून नेमण्यांत आलें. हें काम त्यांनीं फारच चोख केलें. नंतर १९०१ सालीं ठाणा जिल्ह्यांतील शहापूर गांवीं मामले-दार म्हणून नेमलें आणि त्यानंतर १९०३ ते १९०७ सालपर्यंत बांद्रे येथें रेसिडेंट मॅजिस्ट्रेट फर्स्ट क्लास या जागेवर त्यांची नेमणूक झाली, नंतर त्यांची बदली मुरबाड, आनंद, बोरसद ( खेडा जिल्हा )

७५४

येथें होऊन तेथून पुनः ते १९१० सालीं बांद्रें येथें रेसिडेंट मॅजिस्ट्रेटचे जागेवर आले आणि १९१६ सालीं ते सेवानिवृत्त झाले. १९१० सालीं बांद्रें येथें असतांना त्यांना शिरडीस जाऊन श्रीबाबांचें दर्शन घेण्याचा योग आला. ही कथा पुढें येत आहे. सेवानिवृत्तीनंतर त्यांना एक सरकारी जागा मिळाली, पण ती फार वेळ टिकली नाहीं. तेव्हां त्यांनीं त्यानंतर श्रीबाबांची त्यांच्या महासमाधीनंतर मनोभावें सेवा केली आणि तदनंतर शिरडी संस्थानचें काम आपल्या देहपातापर्यंत उत्तम प्रकारें बजाविलें. त्यांच्यामागें त्यांची पत्नी आणि संतती राहिली ती येणेप्रमाणें: (१) डॉ. गजानन दाभोळकर, (२) ताईबाई यशवंतराव गाळवणकर, (३) आक्काबाई देसाई, (४) शांता सामंत, (५) कृष्णा वालावलकर आणि डॉ. दुर्गाबाई दाभोळकर.

## बाबांचें प्रथम दर्शन

शिरडी गांवांत बाबाच्या भक्तांपैकीं तिघेजण (त्रिकूट), म्हाळसापति, काशी-राम शिंपी आणि आप्पा जांगले हे एकजुटीनें वागून आणि धार्मिक वृत्तीनें राहून साधुसंताचा परामर्श घेणारे असे प्रसिद्ध होते. यापैकीं म्हाळसापतीनें, बाबा जेव्हां चांदपाटलाच्या वरच्या लग्नाच्या वराडीबरोबर शिरडीस आले आणि खंडोबाच्या देवळापाशीं म्हाळसापतीच्या खळ्यांत उतरले तेव्हां 'या साई' म्हणत सुस्वागत केलें आणि त्यांनीं व दुसऱ्या दोघां मित्रांनीं त्यांची मशिदींत राहण्याची व्यवस्था केली, ही कथा सर्वविश्रुत आहे. त्याप्रमाणें शिरडीबाहेरहि एक भक्त त्रिकूट होतें. तें म्हणजे नाना (श्री. नानासाहेब चांदोरकर), काका (श्री. हरि सिताराम दीक्षित) आणि अण्णा (श्री. गोविंद रघुनाथ दाभोळकर हे होते. यांपैकीं श्री. नानासाहेब चांदोरकरांना बाबांनीं प्रथम आपल्याकडे ओढून घेतलें. त्यानंतर १९०९ सालीं श्री. काकासाहेब दीक्षित यांना श्री. नानासाहेब यांच्या द्वारें बाबांचें दर्शन झालें. श्री. अण्णा-साहेब दाभोळकर हें बांद्रे येथें १९०३-१९०७ सालांत रेसिडेंट मॅजिस्ट्रेट असतांना त्यांचा व काकासाहे[ब] दीक्षितांचा विशेष स्नेह जमला होता. ते दोघेजण भगवद्गीता वाचीत अस[त] त्यांचा असा संकेत ठरला होता कीं दोघांपैकीं कोणास जर कोणी सत्पुरु[ष] अगर महात्मा भेटला तर, त्यांनीं दुस[ऱ्या]न्यास ती बातमी द्यावयाची. या संकेता प्रमाणें श्री. काकासाहेबांनीं आपल्या बाबाच्या दर्शनाची हकीकत श्री अण्णासाहेबांना सांगितली. ती ऐकून त्यांना बाबांच्या दर्शनाची उत्कंठा लागली. त्याप्रमाणें १९१० सालीं त्यांचें शिरडीस जाण्याचें निश्चित ठरलें. पण एका प्रसंग[ा]मुळें त्यांचें मन लगेच फिरलें. तो प्रसं[ग] असा—त्यांचा एक मित्र, 'गुरुपुत्र लब्धानुग्रह' असा लोणावळ्यास रहा[त] होता. त्यांचा एकुलता एक सुदृढ गुणवा[न] पुत्र एकाएकी आजारी पडला. तेव्हां त[्या] मित्रानें सर्व कांहीं मानवी व दैवी उपा[य] करून पाहिले आणि आपल्या गुरूला[ही] त्या पुत्राजवळ आणून बसविलें; या स[र्व] गोष्टींचा कांहीं फायदा न होतां शेव[टीं] त्या मुलानें दगा दिला, हें वर्तमा[न] कानीं पडतांच अण्णासाहेबांच्या मना[ला] अति उद्विग्नता वाढली. 'गुरूची उप[...]

करता ती काय, त्यांचे हातून एकुलता एक पुत्रहि वांचवेना, कर्म हेंच प्रबल आहे, ललाटीं लिहलेलें तेंच घडून येणार तर मग गुरूच्या मार्गे कां लागा? असे विचार त्यांचे मनीं येऊन शिरडीस जाण्याचा बेत तहकूब झाला. पण पुढें अण्णासाहेब सांगतात कीं,—'जैसें जयाचें अर्जित। नको म्हणतां चालून येत॥ होणारा पुढें कांहींहि न चालत। नेलें मज खेंचित शिरडीस॥ (श्री साईसच्चरित अ. हा प्रकार असा घडून आला. नानासाहेब प्रांताधिकारी (डि. डे. कलेक्टर) असल्यामुळें ते वसईची फेरी करण्यास निघाले, आणि ठाण्यावरून दादरास येऊन बसले. वसईची गाडी येण्यास एक तास अवकाश होता, तेव्हां हा वेळ कसा घालवावा या विवंचनेंत असतां, वांद्यास जाणारी गाडी तेथें आली आणि त्या गाडींत बसून ते वांद्यास आले आणि मला निरोप पाठवून स्टेशनवर बोलविलें. मी भेटतांच शिरडीची कथा सुरू झाली. नानांनीं प्रेमानें पुसलें—' साई-दर्शनास केव्हां निघणार? या कामीं आळस कां? अशी टोलवाटोलवी कां? आपलें मन निश्चित कां नाहीं?' नानाची आतुरता पाहून अण्णा आपल्या चित्तीं शरमले, पण प्रांजलपणें त्यांनीं लोणावळयाच्या मित्रपुत्राची गोष्ट सांगून आपल्या मनाची चंचलता प्रगट केली. त्यावर नानांनी त्यांना प्रेमळ शुद्ध कळकळीचा बोध केला. तो ऐकतांच शिरडी गमनाची अण्णासाहेबांची इच्छा प्रबळ झाली आणि मोठ्या आनंदानें 'तात्काळ निघतों' असें त्यांनीं वचन दिलें, तेव्हां नानांनीं पुढें प्रयाण केलें आणि त्याच दिवशीं अस्तमानीं अण्णांनीं शिरडीस जाण्याची तयारी केली.

## एक छोटा चमत्कार

पुढें दादरवर जाऊन तेथून मुंबई-मनमाड मेल पकडावी या हेतूनें त्यांनीं दादरचें टिकीट काढलें आणि वांद्याच्या स्टेशनवर गाडींत जाऊन बसले. गाडी आतां सुटणार इतक्यांत एक यवन अति चपळतेनें गाडींत आला आणि माझें सामानसुमान पाहून कोठें जाणार म्हणून विचारूं


दिव्य दृष्टीसाठीं ! RAM:-DIVYANETRA

शिसा ऑप्टिशिअन्स (BOM.-DADAR)



( चष्म्यांचे व्यापारी )

यांच्या येथें डोळ्यांच्या तज्ञ डॉक्टरांकडून डोळे मोफत तपासून उंची व टिकाऊ चष्मे माफक दरानें मिळतात.

छबीलदास रोड, दादर ( W. R. ), मुंबई २८.

लागला—अण्णांनीं उत्तर दिलें कीं, दादरवर जाऊन मनमाडची मेल साध-णार. त्यावर तो म्हणाला—दादरवर उतरूं नका, तेथें मेल थांबणार नाहीं, बोरी-बंदर गांठा. ही सूचना त्यांना वेळेवर मिळाली नसती तर मनमाडची मेल चुकून ठरल्याप्रमाणें त्यांना शिरडीस जातां आलें नसतें आणि त्यांचे मनांत नानाप्रकारचे तर्क वितर्क आले असते. पण त्यांचा प्रयाणयोग चांगला असल्या-मुळें अवचित हा प्रकार घडला.

## दर्शनाची नवलाई

तिकडे शिरडींत काकासाहेब दीक्षित यांची मार्गप्रतीक्षा करीत होते. दुसरे दिवशीं दहा वाजतां अण्णा शिरडींत सादर झाले आणि टांग्यांतून उतरून साठ्याचे वाड्यांत जाणार तोंच साई-बाबाचें दर्शन केव्हां घेईन आणि त्यांचे चरणीं कधीं मस्तक ठेवीन अशी दर्शन—उत्सुकता प्रबळ झाली आणि त्यांचे मनांत आनंदलहरी उसळूं लागल्या. इतक्यांत साईचे परम भक्त तात्यासाहेब नूलकर हे मशिदींतून परत आले आणि म्हणाले कीं—बाबा वाड्याचे कोपऱ्यापाशीं येत आहेत. आधीं धूळभेट घ्या, मग बाबा लेंडीस जातील नंतर स्नान वगैरे आटोपून पुनः स्वस्थपणें मशिदींत दर्शन घ्या. हें ऐकून अण्णा, बाबा होते त्याठायीं घाईघाईनें धांवत गेले आणि त्यांनीं पुढें काय केलें व त्यांना काय वाटलें, हें त्यांच्याच शब्दांत सांगू द्या.

धुळींत घातलें लोटांगण पायीं । आनंदन माई मनांत ॥२·१३७॥ नानासाहेब सांगून गेले । त्याहून अधिक प्रत्यक्ष पाहिलें ॥ दर्शनें म्यां धन्य मानिलें । साफल्य झालें नयनांचें ॥ १३८ ॥ कधीं ऐकिली नाहीं देखिली । मूर्ति पाहूनि दृष्टि निवाली तहानभूक सारी हरपली । तटस्थ ठेलीं इंद्रियें ॥ १३९ ॥ लाधलों साईचा चरण स्पर्श । पावलों जो परामर्ष ॥ तोच या जीवाचा परमोत्कर्ष । नूतन आयुष्य तेथूनि ॥ १४० ॥ ज्यांचेनि पावलों परमार्थानें । तेच कीं खरे आप्त मोके ॥ सोयरे नाहींत तया परते । ऐसें निजचित्तें मानी मी ॥ १४२ ॥ साईदर्शनीं हीच नवाई । दर्शनें वृत्तीस पालट होई ॥ पूर्व कर्माची मावळे सई । वीट विषयीं हळुहळू ॥ १४४ ॥

## अंतर्ज्ञानी व त्रिकालज्ञ बाबा.

अंगीं दुर्धर देहाभिमान । तेणेंच वादा-वादीचें जनन अहंभावाची ही खूण । नाहीं त्याविण वाद जगीं ॥

—श्रीसाईसच्चरित. अ. २—१५४

शिरडीस आल्यावर पहिल्या दिवशींच अण्णासाहेबाचा आणि बाळासाहेब भाट्याचा मोठा कडाक्याचा वाद जुंपला. 'गुरूची आवश्यकता' हा वादाचा विषय होता.

पुढें यांतून दैव थोर कीं कर्तृत्व थोर-प्रयत्न व प्रयत्नवाद हा विषय निघाला. अण्णासाहेबांचें म्हणणें थोडक्यांत असें होतें कीं आपली स्वतंत्रता सोडून आपण परतंत्र कां व्हावें, आपण निजकर्तव्य दक्ष असतों तर गुरु कशास हवा, ज्याचें त्यानेंच केलें पाहिजे, न करी त्यास गुरु काय देणार, हातपाय न हालवितां जो निजणार त्यास कोण

काय देणार; जो करील त्याचेंच सर्व आहे आळशापरी बसून राहील तर तें दैव कसें सहन करील ज्याचा उद्धार त्यानेंच केला पाहिजे, इत्यादि. बाळासाहेब भाटे यांचें म्हणणें असें होतें कीं, होणार तें टळणार नाहीं, मी मी म्हणणार भागून गेले. दैवापुढें कोण काय करणार, एक करावयाला जावें तों दुसरेंच होतें, तुमची चतुराई बाजूस ठेवा, अभिमानाचा उपयोग कांहीं नाहीं, इत्यादि. याप्रमाणें उभय पक्षकार अनेक साधकबाधक प्रमाणें देत देत तब्बल दोन घटका वादत भांडत राहिले. तरी वादाचा निर्णय नेहमींप्रमाणें कांहीं होईना; आणि त्यापासून कांहींच निष्पन्न झालें नाहीं. अखेर दमून आणि मनःस्वास्थ्य गमावून दोघांनीं वाद आटपता घेतला. शेवटीं मंडळीसमवेत मशिदींत जातात तोंच बाबांनीं काकासाहेबाकडे पाहत पुढील वाक्बाण सोडला—

काय चाललें होतें वाड्यांत। वाद कशाचा होता भांडत ॥ काय म्हणाले हेमाडपंत। मजकडे पहात बोलले ॥

— श्रीसाईसच्चरित. अ. २·१६६

हें ऐकतांच अण्णासाहेब मनीं चमकले. वाड्यापासून मशिदीपर्यंत बरेंच अंतर आहे, तेव्हां आमचा वाद चालला होता हें बाबांना कसें समजलें? याचें त्यांना महदाश्चर्य वाटलें. बाबांच्या वाक्बाणानें हत होऊन ते निःशब्दच लज्जावनत झाले.

## अन्वर्थक व भविष्य सुचविणारी संज्ञा

**हेमाडपंत** म्हणून बाबांनीं आपणांस कां संबोधिलें या विषयीं अण्णासाहेब आपल्या मनांत विचार करूं लागले. हेमाद्रिपंत या संस्कृत नांवाचें हेमाडपंत मराठी (प्राकृत) रूपांतर. हे पंत देवगिरीचे यादव वंशांतील महादेव व रामदेव या राजांचे सुप्रसिद्ध मंत्री होते. ते विद्वान्, सुशील असून प्रख्यात ग्रंथकार होते. जमाखर्चाच्या व हिशेबाच्या चांगल्या पद्धति त्यांनीं अंमलांत आणल्या, मोडी लिपीचे ते उत्पादक होते असें म्हणतात. तेव्हां मी मूर्ख, अकुशल, अल्पमति व मंदबुद्धि असतां, ही पदवी बाबांनीं मला कां दिली यांतलें गूढ त्यांना समजेना. पण पुढील इतिहास पाहतां, अण्णासाहेबांना शिरडी संस्थानचे कागदपत्र हिशेब जमाखर्च ठेवावे लागतील आणि श्रीसाइसच्चरितासारखी भक्तिमान् वैराग्यपूर्ण ग्रंथ लिहावा लागेल हें भविष्य बाबांनीं केलें आणि पुढें तें अक्षरशः खरें ठरलें.

आतां अण्णासाहेबांच्या शब्दांत या प्रकरणाचा उपसंहार करूं.

उगाच ना या पदवीचें दान। चतुराईचा हा सन्मान ॥ वादावादीवरी हा वाग्बाण। अभिमान खंडण व्हावया ॥ श्री. सा. स. अ. ॥ २–१८४ ॥ गळून जावा वादाभिमान। एतदर्थ हें अभिधान ॥ जेणें आमरण रहावें भान। नित्य निरभिमान असावें ॥ १८८ ॥ कृष्ण परब्रह्माचें रूपडें। तयास ही गुरु करणें पडे ॥ १९० ॥ तेथें माझी काय मात। वादावादी करावी किमर्थ ॥ गुरुवीण ज्ञान वा परमार्थ। नाहीं हा शास्त्रार्थ दृढ केला ॥ १९१ ॥

## रोगनिवारण आणि ग्रामसंरक्षण

संत देखिले अनेक। परि दळणारा

हाचि एक ।। गहूं पिसण्याचें तें काय सुख । त्याचें कौतुक तो जाणे ।।

—श्रीसाईसच्चरित. अ. १–११६

१९१० सालानंतरची गोष्ट श्रीसाईसच्चरितकार श्री. गोविंद रघुनाथ ऊर्फ अण्णासाहेब दाभोळकर हे प्रथम १९१० सालीं श्रीबाबांचें दर्शनार्थ शिरडीस गेले हें वर सांगितलें आहे. एके दिवशीं सकाळीं ते मशिदींत (द्वारकामाईंत) गेले असतां अत्यंत विस्मयकारक असा एक प्रसंग—चमत्कार त्यांच्या दृष्टीस पडला. दंतधावन मुखप्रक्षालनादि विधि उरकून बाबांनीं गहूं दळण्यास सुरवात केली. हातीं एक सूप घेऊन गव्हाच्या पोत्यासमीप जाऊन, त्यांनीं त्यांत एक पायलीभर गहूं काढले. दुसरा एक रिकामा गोण घेऊन तो जमिनीवर पसरला आणि त्यावर जातें बसविलें. आणि जात्याचा खुंटा घट्ट करून कफनीचा घोळ आवरून, आणि अस्तन्या वर करून जात्याजवळ पाय पसरून बसले आणि खालीं मान घालून खुंटा धरून घैरा रिचवून जातें ओढूं (दळूं) लागले. बाबा अपरिग्रही व अकिंचन, त्यांना ही दळण्याची उठाठेव कशाला हवी असा विचार अण्णासाहेबांच्या मनांत येऊन त्यांना महदाश्चर्य वाटलें. लोकहि साश्चर्य चित्तानें पाहूं लागले, पण आपण हें काय आरंभिलें आहे असें बाबांना विचारण्यास कोणासहि धैर्य होईना. हां हां म्हणतां ही दळणाची वार्ता गांवांत पसरली आणि नरनारींचा समुदाय मशिदीकडे वळूं लागला. त्यांतल्या त्यांत चार बाया जोरानें पुढें आल्या आणि लगबगीनें मशिदींत चढल्या आणि बाबाबरोबर भांडून त्यांचे हातांतील खुंटा हिसकावून घेऊन त्या बाबांच्या लीला गात एकसारख्या दळूं लागल्या. बाबा प्रथम रागावले, पण त्या बायांचें प्रेम पाहून त्यांच्या रागाचें पर्यवसान अनुरागांत होऊन बाबा गालांतले गालांत हासूं लागले. तेव्हां त्या बायांच्या मनांत असे विचारतरंग येऊं लागले कीं, बाबांना ना घरदार, ना पोर ना संसार, भिक्षावृत्तीनें राहणारे ते, त्यांना रोट्या भाकऱ्या करण्याची जरुरी नाहीं, तेव्हां एवढी कणिक घेऊन ते काय करणार? ते परम कृपाळ असल्यामुळें आमच्याकरितांच ते हा खेळ खेळीत आहेत आणि ही सर्व कणिक आम्हाला ते देऊन टाकणार. अशा प्रकारें मनांत मांडे खातखात त्यांनीं तें दळण संपविलें. याप्रमाणें बायांच्या मनांत लोभाचा प्रवेश झाला. पण बाबांचे खेळ बाबांनाच माहीत. इतरांना त्यांचा अंत कसा लागणार? दळण आटपल्यावर त्या बायांनीं जातें भिंतीस टेंकून ठेविलें आणि पीठ गोळा करून त्याचे चार भाग करून ते त्या घेऊन जाऊं लागल्या. इतकावेळपर्यंत स्वस्थ बसलेले बाबा आतां रागावून बोलूं लागले — बायांनो, तुम्हांला चळ लागला काय? तुम्ही कोणाच्या बापाचा माल घेऊन जातां? मला लुटावयाला या फुकटखाऊ रांडा धांवून आल्या आहेत, मी काय तुमचेकडून हे गहूं उसने आणले आहेत. म्हणून तुम्ही त्याचे पीठ नेतां? उठा हें पीठ घेऊन जा आणि गांवच्या शिवेवर नेऊन टाका. बाबांचे हे शब्द ऐकून लोभाच्या पायी

फजित पावून त्या बाया मनांत बहु चुरचुरल्या आणि आपसांत कुजबुजून शेवटीं त्या शिवेवर गेल्या आणि बाबांच्या हुकूमाप्रमाणें त्यांनीं तें पीठ शिवेवर फेकून दिलें.

अण्णासाहेबांनीं लोकांना विचारलें कीं, बाबांनीं हें काय केलें? त्यांनीं सांगितलें कीं, गांवांत महामारीची (पटकीची) सांथ आली होती. ह्या साथीवर बाबांनीं हा तोडगा केला. गहूं नव्हे तर महामारीच बाबांनीं जात्यांत भरली आणि त्याचा भरडा शिवेवर टाकविला. पीठ ओढ्याच्या कांठीं टाकिलें, तेव्हांपासून सांथीस आहोटी लागून गांवच्या लोकांचे दुर्दिन गेले आणि गांवास शांति लाभली, हें ऐकून अण्णासाहेबांना फार कौतुक वाटलें ह्यांचा आणि साथीच्या रोगाचा काय संबंध, याचा कार्यकारणभाव कसा जुळवावा, हा ताळा कसा बसवावा हा सर्व प्रकार अगदीं अतर्क्य दिसतो, याचेवर आपण कांहीं तरी प्रबंध लिहावा आणि बाबांची माधुरी कथा पोटभर गावी असें त्यांना वाटून त्यांच्या अंतरीं बाबाविषयीं प्रेम उचंबळूं लागलें. श्री साईसच्चरित लिहिण्याची प्रेरणा त्यांना यापासून झाली आणि पुढें बाबांच्या कृपेनें आणि आशिर्वादानें त्यांचें हातून श्रीसाईसच्चरित लिहिलें गेले. बाबाचे आणि अण्णासाहेब दाभोळकराचे आम्हां सर्व भक्तगणांवर किती तरी अलोट उपकार आहेत!

वर वर्णिलेला दळणाचा प्रकार 'पार्थिव' होय. याशिवाय बाबाचा 'अपार्थिव' अध्यात्मिक असा एक दळणाचा प्रकार आहे. शिरडींत पांच तपें म्हणजे अजमासे साठ वर्षे बाबांचें वास्तव्य होतें असें सांगतात. इतका सर्व काळ बाबांनीं दुसऱ्या 'बृहत किंवा सूक्ष्म' म्हणा म्हणजे अध्यात्मिक दळणाचा प्रकार चालू ठेविला होता; आणि १९१८ सालीं घेतलेल्या महासमाधीनंतर आतांपर्यंतहि चालू ठेविला

**जैसें डोळ्यां अंजन भेटे। ते वेळीं दृष्टीसी फांटा फुटे ॥**
**मग वास पाहिजे तेथ प्रगटे। महानिधी ॥** ज्ञानेश्वर ॥
ही कदाचित् कविकल्पना असेल—पण डोळे काळजीपूर्वक तपासून
अचूक चष्मा बनवून घेतल्यास, शतायुषी झालांत तरी दृष्टि स्वच्छ रहाते
हें सत्य आहे. याकरितां निर्दोष चष्मे बनविणार

# शेंडे आणि कंपनी

**बोरभाट लेन, गिरगांव, मुंबई ४**
यांचा सल्ला घेऊन निर्धास्त रहा.
बाहेरगांवींही फ्रेम्स, लेन्सीस् व प्रिस्क्रिप्शनप्रमाणें
चष्मे बनवून ऑर्डरप्रमाणें पाठवूं.

आहे असें आम्हांस वाटतें. या दळणाचा प्रकार असा. या दळणाचें जातें असें कीं, कर्म व भक्ति ही त्याची दोन पेंडे (तळी), ज्ञान हा त्या जात्याचा खुंटा, आणि अशा या जात्यावर बाबांनीं आपल्या योग–सामर्थ्यानें शेंकडों नव्हे तर हजारों लोकांच्या–भक्तांच्या आधिव्याधि, दुःख दैन्य व दारिद्र्य, मनस्ताप राजस तामस दुष्ट असा पदार्थ म्हणजे अहंकार,इ०यांना दळून त्यांचा चांगला भरडा (बारीक पीठ) करून भक्तांना शांति व सुख यांचा लाभ करून दिला आणि अद्यापहि देत आहेत.

अहंकार हा फार कठीण पदार्थ, पण तो तसाच अत्यंत सूक्ष्म असल्यामुळें दळून भरडून त्याचा नाश करणें हें सर्वांत फार कठीण काम आहे. 'नवल अहंकाराची गोठी। विशेषें नलगे अज्ञानापाठीं॥ सज्ञानाचे झोंबे कंठीं। नाना संकटीं नाचवी॥ (ज्ञानेश्वरी अ. १३–८२). यांत ज्ञानेश्वरांनीं सांगितल्याप्रमाणें अहंकार हा मोठामोठ्या ज्ञानी पंडितांना नाडतो, त्रास देतो. बाबांनीं प्रथम अपल्या अंहकारांला केव्हांच तिलांजली देऊन टाकिली होती. याविषयीं खालील ओव्या (श्रीसाईसच्चरित. अध्याय १०) पहा—

भक्तकणवा बाबांची वाणी। वदती अति लीनपणीं 'दासानुदास मी तुमचा ऋणी। निघालों दर्शनीं तुमचिया॥ ९०॥
ही एक तुमचीच कृपा मोठी। झाली मज तुमचें पायाची, किडा मी तुमचे विष्ठे पोटी। धन्य मी सृष्टीं तेणेनी॥९१॥
काय बाबाची ही लीनता। नम्रपणाची ही हौस चित्ता। काय ही उच्च निराभिमानता। शालीनता ही तशीच॥ ९२॥

बाबांनीं आपल्या अहंकाराचा चुराडा केला, तसा इतरांच्या म्ह. भक्तांच्या अहंकाराचाहि चुराडा केल्याच्या कथा श्रीसाईलीला मासिकामध्यें आल्या आहेत व येत आहेत. ह्या त्यांच्या अध्यात्मिक दळण लीलेमुळें बाबा आमच्या अल्पमतीस, ते साधे साधु नसून, सच्चिदानंद पतीतपावन, दीन दयाघन, परम कारुणिक षड् गुणैश्वर्य भगवान आहेत असें वाटतें. आम्हांसच नव्हे तर इतर पुष्कळांनाहि ते तसें वाटतात हें आम्हीं पाहिलेलें आहे.

## साईबाबा हे कोण ?

हा प्रश्न मागें आम्हीं श्रीसाईसच्चरित इंग्रजी (पहिली आवृत्ति) आणि श्रीसाईलीला, मासिकाच्या वर्ष ३२ वें, अंक दुसरा यांत (पान १६–१७) **'साईबाबा हे कोण'** या विषयीं विचार केला होता. पण पुनः याविषयीं चर्चा करणें योग्य व प्रासंगिक वाटतें, कारण 'ओरिएंट लॉंगमन्स' या युरोपियन कंपनीनें, मिस्टर **आर्थर ऑस्बोर्न** या विद्वानांनीं लिहिलेला 'दि इन्क्रेडिबल साईबाबा' इंग्रजी ग्रंथ नुकताच (म्हणजे १९५७ दिसंबर) प्रसिद्ध केला. त्यांतील आरंभीच्या पुरस्कारामध्यें कान्हनगड, आनंदाश्रम येथील स्वामी रामदास यांनीं आपलें असें स्पष्ट मत दिलें आहे कीं—'जो कोणी साईबाबा किंवा त्यांचे शिष्य सहवासांत आला असेल त्याला साईबाबा हे एक अत्युच्च अध्यात्मिक उन्नतीचे संत होते आणि आतांहि आहेत ही गोष्ट नाकारतां येणार नाहीं आणि रामदास तर खात्रीनें असें विधान करूं शकतो.'

मूळ ग्रंथ, पान ६–७ येथें मिस्टर ऑसबॉर्न साहेब सांगतात कीं हिंदुस्थानांत बहुतेक असा दुसरा संत नाहीं कीं ज्याचे किंवा ज्याच्या पंथाचे लोक इतक्या विस्तृत रीतीनें पसरलेलें आहेत. हे विधान बरोबर सांगावयाचें म्हणजे अवतारांत अंतर्भूत असणाऱ्या श्रीरामकृष्ण यांना लागू नाहीं.

याचें तात्पर्य असें कीं, अद्यापि '**साईबाबा हे कोण**' यां प्रश्नाचा योग्य निर्णय कांहीं जणांच्या मतें अद्याप लागला नाहीं. तेव्हां याविषयीं पुनः थोडें विवरण करणें जरूर आहे असें वाटतें.

याविषयीं तीन मतें प्रचलित आहेत. तीं अशीं—

( १ ) वरवर पाहणारे बहिर्मुख दृष्टीचे लोक असे म्हणतात कीं, बाबा हे एक वेडे फकीर होते. बरींच वर्षें ते शिरडी येथील एका जुन्या व जीर्ण मशीदींत राहिले होते. ते लोकांपाशी दक्षिणा मागत आणि केव्हां केव्हां संतापून बोलत आणि रागावत असत. हें मत अगदीं चुकीचें आहे. याविषयीं बाबांचाच असा स्पष्ट खुलासा आहे कीं, मुंबईस परत जातेवेळीं बाबांचा निरोप घेतांना, श्री. रा. आ. तर्खड यांच्या मित्राच्या (हे मित्र तर्खडच असावे आणि त्याच्या नांवाखाली ते लिहीत असावे) डोळ्यांतून अश्रु आले, तेव्हां बाबा म्हणाले–हें काय वेड्यावानी करतोस? मी तिकडे (मुंबईस) नाहीं कां तुजपाशीं? मित्र म्हणाले—ते मला कळतें, पण अनुभव नाहीं. तेव्हां बाबा उत्तरले कीं अरे, ज्याला वाटतें कीं, बाबा हे शिरडींतच आहेत, त्यांनीं बाबाला खऱ्या, सच्च्या बाबाला मुळींच नाहीं बघितलें. मित्राला याचें आश्चर्य वाटलें. पण विचारान्तीं त्याला बाबांचें बोलणें पटलें कीं, खरें बाबांना पाहणें म्हणजे अंतर्मुख व आत्मसाक्षात्कारी होणें. (पान २०८ श्रीसाईलीला १९२५)

( २ ) बरेच लोक समजतात कीं, बाबा हे एक संत होते. कांहीं मुसलमान त्यांना पीर, तर कांहीं हिंदु त्यांना संत–साधु मानतात. शिरडी संस्थान कमिटी आपल्या प्रत्येक उत्सवाच्या नोटीसींत 'आधुनिक संत चुडामणि' असा उल्लेख करीत असे; अलीकडे आपल्या नोटीसींत पुढीलभागीं बराच चांगला बदल केला आहे. श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामी, प्रसिडेंड आल इंडिया साईसमाज मद्रास, ह्यांनीं पुस्तकांत (आणि 'the wonderous Saint Sai Baba' असा एक लहा-नसा ग्रंथहि लिहून) बाबांचा संत म्हणून प्रामुख्यानें उल्लेख केला आहे. हें मत सुद्धां बरोबर वाटत नाहीं. कारण

बाबा हे मानव किंवा मानव कोटींतील संत नसून ते देवकोटींतील एक मोठी विभूति किंवा अवतार आहेत. बाबाच्या विशेष व निकट परिचय असणाऱ्या आणि त्यांचें खरेंखुरें स्वरूप जाणणाऱ्या अनेक भक्तांची–श्रेष्ठ भक्तांची तशी श्रद्धा होती व आहे. उदाहरणार्थ कांहीं दाखले येथें देतों.

( १ ) ऑनरेबल मिस्टर जस्टिस एम्. बी. रेगे, बी. ए. एल्. एल्. बी. हायकोर्ट जज्ज इंदूर हे म्हणतात कीं–'बाबा हे हयात असतांना आपल्या शब्दांनीं व कृतींनीं साधकांना मार्गदर्शन करणारे परमात्म्याचे अवतार होते. आतां त्यांचा देह नाहींसा झाला तरी, त्या देहांत

वास करणारे बाबा आतां परमात्म-स्वरूपांत वास्तव्य करून आपल्या अनेक भक्तांना पूर्वीप्रमाणेंच मार्गदर्शन करीत करीत आहेत. ( बी. व्ही. नरसिंहस्वामी-कृत सेंइंग्स आणि चारटर्स, पान १–२ )

( २ ) उत्तरेकडील एका संस्थानचे हायकोर्ट जज्ज म्हणतात—बाबांना, उत्पत्ति स्थिति व लय यांचा कर्ता असें मी त्यांच्या समाधी ( १९१८) पूर्वी मानीत होतों आणि आतांहि मानतों. ते कुटें गेले नाहींत, तर ते आतांहि आहेतच.

ते उपाधिरहित होते, आमच्याबरोबर ते जेव्हां होते, तेव्हां त्यांचा देह होता हें आम्हांला स्पष्ट भासत असे, पण पुष्कळदां त्यांच्या अनंत स्वरुपाचाच साक्षात्कार आम्हांला मिळे. मला तर असें वाटे कीं, सान्त आणि अनंत अशीं त्यांचीं दोन्हीं स्वरुपें त्यांच्यामध्यें पूर्ण सामावलेलीं होतीं. तरी ते सान्त स्वरुपांत आम्हांला केव्हां केव्हां भासत आतां त्यांचा देह विलीन झाल्यामुळें ते साईबाबा आतां अनंत स्वरूपांत आहेत ( बी. व्ही. नर-सिंहस्वामिकृत भक्तानुभव पान १ )

( ३ ) सायन्स कॉलेजचे ( एंजिनियरींग कॉलेजचे ) पुणे येथील प्रोफेसर जी. जी. नाईक, एम्. ए. एस. एस. सी म्हणतात कीं—

आमच्या नित्य पूजेच्या देव्हाऱ्यांत मी साईबाबांची स्थापना केली आहे. साईबाबा हे साधारण सत्पुरुष नसून देव आहेत. माझे श्वसुर श्री. बुटी ( बाबांचे समाधि मंदिरबांधणारे ) माझी पत्नी आणि माता हे सर्व श्रीबाबांचें भक्त असून त्यांना देव मानून पूजा करीत.

माझ्या प्रथम भेटीचे वेळीं बाबा एकदां अतिशय रागानें संतप्त झाले होते. कांहीं कारण नसतां ते संतापानें शिव्या-शाप देऊन धमक्या देऊं लागले. हा वेडा पीर तर नाहींना अशी मला शंका आली. हा विचार सहज माझे मनांत येऊं गेला. दुपारीं मी त्यांचेकडे गेलों आणि त्यांचे पाद संवाहन करूं लागलों. त्यांनीं माझ्या डोक्यावर थापट मारून—म्हटलें कीं, 'मी कांहीं वेडा नाहीं.' मी आश्चर्यचकित झालो. मला वाटलें कीं, ते माझें हृदयनिरीक्षण करीत आहेत. त्यांना गुप्त असें कांहीं नाहीं. ते माझे अंतर्यामी—अंतरात्मा आहेत. तेव्हांपासून अशी त्यांच्या अंतर्यामित्वाची पुष्कळ उदाहरणें माझ्या दृष्टोत्पत्तीस आलीं, जेव्हां ते बोलत तेव्हां माझ्या हृदयांत राहून माझ्या सर्व वृत्ति (विचार) वगैरे पूर्णपणें जाणूनच ते भाषण करितात असें मला वाटे. तेव्हां हा अंतरात्मा आहे, देव आहे असा निर्णय करण्यांत मला कांहीं शंका राहिली नाहीं. मी अनेकदां त्यांची परीक्षा पाहिली. तेव्हां प्रत्येक वेळेस ते सर्व साक्षी आणि सर्व शक्तिमान आहेत, कर्तेकरविते देव आहेत अशी माझी त्यांनीं खात्री पटवत गेली. ( बी. व्ही. नरसिंहस्वामीकृत भक्तानुभव पान १९–२० )

( दि ऑनरेबल दादासाहेब खापर्डे-यन्हाड अमरावतीचे सुप्रसिद्ध ॲडव्होकेट म्हणतात कीं ' प्रत्येकाच्या अंतःकरणांतील गुप्तविचार ते ( बाबा ) जाणतात, त्यांच्या गरजा दूर करतात आणि सर्वांना सुख देतात. पृथ्वीवरील देवाची माझी कल्पना त्यांचे ठायीं पूर्ण झाली आहे असें मला वाटलें. ( रा. ब. मोरेश्वर प्रधान यांच्या

'शिरडीचे साईबाबा' या इंग्रजी ग्रंथाची प्रस्तावना.)

(५) श्री दासगणूमहाराज, श्री बाबाविषयीं असें म्हणतात कीं :—

जगाचें आद्य कारण । जें कां विमल चैतन्य ॥ तें तुम्हीं अहां दयाघन । विश्व हा विलास तुमचाची ॥

—श्रीसाईनाथ स्तवन मंजरी, ओंवी १७.

(६) 'दळणारा विचित्र साधु' म्हणून श्रीसाईसच्चरितांत 'सूतोवाच' करणाऱ्या हेमाडपंतांना पुढें बाबा कसे दिसले याविषयीं त्यांचे पुढील उद्गार पहा.

कोणी म्हणोत भगवद्भक्त । कोणी म्हणोत महाभागवत ॥ परी आम्हांस ते **साक्षात् भगवंत । मूर्तिमंत** वाटले ॥

—श्रीसाईसच्चरित. ११–२५

जें पूर्णब्रह्म सनातन । स्वयंज्योती निरंजन ॥ पाहून ऐसें साईचें ध्यान । सुप्रसन्न मन झालें ॥ (अं. १८–४१) अगाध साईनाथाचा महिमा । अगाध तयाच्या कथा परमा ॥ अगाध साई चरित्राची सीमा । मूर्त परब्रह्मावतार ॥

(अ. २१–१२६)

साईसमर्थ ब्रह्म सनातन । ब्रह्म लिखित तयाचे वचन ॥ पाहील जो विश्वास ठेवून । घेईल पूर्ण अनुभव तो ॥

—(अ. ३१–८५)

यश–श्री–औदार्य–ज्ञान । शांति वैराग्य हे षड्गुण ॥ इहीं श्रीसाई **भगवंत** पूर्ण । ऐश्वर्य संपूर्ण हरि जैसा ॥

—(अ. ४१–१७)

(७) शिरडी संस्थान कमिटी, ही उत्सवाच्या नोटीसींतील शेवटच्या पानावर 'श्रीसाई सर्व श्रेष्ठ परमात्मा आहेत' असा उल्लेख करीत असते.

(८) शिरडींतील बाबांचे सर्व निकटवर्ति भक्त, कै. माधवराव देशपांडे (शामा) आणि इतर सर्व भक्तहि बाबांना 'देव' म्हणून संबोधित असत.

तेव्हां बाबांना पूर्ण सनातन ब्रह्म, स्वयंज्योति निरंजन, साक्षात भगवान असें मानून त्यांचें स्मरण करणें आणि इतर धार्मिक कृत्यें करणें हेंच युक्त ठरतें.

(अपूर्ण)

---


ए. आर. सावंत ॲन्ड ब्रदर्स

२६३, मंगळदास मार्केट समोर, मुंबई नं. २.

ARSA PRODUCTS

❀ होजियरी ❀ तयार कपडे ❀ फर्निशिंग फॅब्रीक्स

व इतर सर्व तऱ्हेच्या कापडाचे व्यापारी

रिटेलर्स व होलसेलर्स    टे. नं. २२८४४


253